# बृहन्महाराष्ट्र वृत्त

BMM बृहन्महाराष्ट्र मंडळ

On the web:
www.bmmonline.org

उत्तर अमेरिकेतील एकमेव मराठी मासिक

जून २००७
वर्ष २७, अंक ६


# सिॲटल अधिवेशनाची नांवनोंदणी २२००चे वर

## अध्यक्षीय

*नमस्कार मंडळी,*

*जुलै २००५ मधे माझी बृ. मंडळाच्या अध्यक्षपदी निवडणूक झाली त्यावेळी मी बृ. मंडळाच्या कार्यात काही आमूलाग्र बदल घडवून आणण्याचे ठरविले होते. गेल्या दोन वर्षात आम्ही त्यात बरेचसे यशस्वी झालो असे अभिमानाने सांगावेसे वाटते. गेल्या दोन वर्षातील आमच्या कामाचा आढावा असा:*

*- मंडळाचे नविन चिन्ह व वेबसाईटची नविन, आकर्षक मांडणी*
*- बृ. मंडळाच्या सदस्यात २० स्थानिक मंडळे होती. त्या संख्येत ३६ पर्यंत (जवळ जवळ दुप्पट) वाढ,*
*- अधिवेशन सोडून टॅलेंट ट्रान्सफर, तसेच बॉस्टन, टोरांटो, व ओरलॅंडो येथील विभागीय व शिकागो येथील अंतिम एकांकिका स्पर्धा. भारतातील कलाकारांचे ४ यशस्वी दौरे - विशेषतः या वर्षीचा दोन नाटकांचा दौरा,*
*- बृ. मंडळाच्या घटनेतील बदल व सल्लागार मंडळाची नेमणूक*
*- बृ. मंडळाचा आर्थिक पाया मजबूत करण्यास सुरूवात, वृत्ताच्या आजीव सभासदांच्या वर्गणीची व इतर शिल्लकीची स्वतंत्र खात्यात गुंतवणूक, वार्षिक अहवाल वेळेत सादर*
*- अधिवेशन यशस्वी करण्यास सिॲटल अधिवेशनाचे सूत्रधार जयंत भोपटकर व त्यांचे सहकारी यांचेबरोबर सुरवातीपासून सहकार्याने आखणी*

*मी अध्यक्षपदाची सूत्रे हाती घेतली तेव्हां ७ नवीन व्यक्तींबरोबर काम करणे हे एक आवाहन वाटत होते. परंतु आम्ही सर्वांनी सुरवातीलाच एक टीम म्हणून काम करण्याचे ठरविले व बृ. मंडळाच्या कार्याची दिशा ठरविल्यावर पुढचे काम सोपे झाले. आम्ही ठरविलेला बहुतेक कार्यक्रम पुरा करू शकलो याचे श्रेय या ७ मंडळींना आहे आणि त्यांनी दिलेल्या सहकार्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे.*

*बृ. मंडळावर काम करताना एक गोष्ट विशेष ध्यानात आली की मंडळाचे भवितव्य आता तरूण पिढीच्या हातात आहे. दर दोन वर्षांनी **MAIYTRA**चे अधिवेशन भरवीत असलो तरी त्यांना आकर्षित करेल असा कार्यक्रम दर दोन वर्षांनी करण्याऐवजी सातत्याने करणे जरूरीचे आहे. त्यासाठी बृ. मंडळाच्या कार्यकारिणीत तरूण मंडळी येतील अशा प्रकारचे प्रयत्न करायला हवेत. तरच बृ. मंडळाच्या भवितव्याबद्दल आशावादी होता येईल.*

*गेली दोन वर्षे वृत्तांच्या वाचकांशी 'अध्यक्षीय' द्वारे मी संपर्क ठेवू शकलो. अनेक वाचकांनी मला मार्गदर्शन केले, प्रोत्साहन दिले. त्याबद्दल मी आभारी आहे. माझी कारकीर्द संपत असली तरी माजी अध्यक्ष या नात्याने मी बृ. मंडळाच्या कार्यात भाग घेत राहीन असे मी आश्वासन देतो व आपणही असेच सहकार्य नविन अध्यक्षांना व पर्यायाने बृ. मंडळाला द्यावे अशी विनंती करतो.*

*कळावे लोभ असावा ही विनंती*


***जगदीश वासुदेव***
***अध्यक्ष, बृ. मंडळ उत्तर अमेरिका***
***president@bmmonline.org***


**The BMM 2007 Business Conference** will be held on Thursday, June 28 2007 and will bring together entrepreneurs, venture capitalists, officials of the Government of Maharashtra and professionals in the United States. Maharashtra boasts of world class institutions in education, a large and varied industrial base in IT, Biotechnology and Automobiles etc. amongst others. A leading state in foreign investment, with large ports, railway and road infrastructure, Maharashtra offers a very favorable business environment.

The Chief Minister of Maharashtra, Hon. Mr. Vilasrao Deshmukh will be the Chief Guest at the Conference. Also gracing the event will be Hon. Mr. Ashok Chavan, Minister for Industry, Mining, Corporate Affairs and Protocol. They will be accompanied by a high level state delegation.

Major corporations from the United States are represented in this conference, including Microsoft, Boeing, and Merrill Lynch. (Details on Page 3)

## या अंकात ......


संपादकीय २
सिॲटल अधिवेशन ३
मंडळांतून फेरफटका... ४
प्रेसिडेंट स्कॉलर प्रातिक भिडे ५
सिॲटल अधिवेशन कार्यक्रम ६
सिॲटल अधिवेशन जेवणाचा मेनू ७
पुस्तक परिचय ८
उत्तर रंग ९
एक वेगळा इतिहास - तुमचा आमचा १०
शेवटचे पान ११

## बृहन्महाराष्ट्र वृत्त

बृहन्महाराष्ट्र मंडळ उत्तर अमेरिका या संस्थेचे मुखपत्र
स्थापना १९८१ (शिकागो)

संस्थापक
कै. विष्णु वैद्य, कै. शरद गोडबोले, जयश्री हुपरीकर

संपादक मंडळ
मोहन रानडे, विद्या हर्डीकर सप्रे, मधुवंती भाट

बृहन्महाराष्ट्र वृत्त कार्यालय
144 Hope Road, Holland PA 18966
Tel: 1-800-300-6430
E-mail: editorbmm@yahoo.com

मुद्रक आणि वितरक
दिलीप नामजोशी
Sir Speedy Printing, Blue Bell, PA

वर्गणीचे दर

| | US | Canada | Other |
|---|---|---|---|
| वार्षिक | $21 | $31 | $41 |
| द्वैवार्षिक | $40 | $60 | $80 |
| आजीव | $250 | $375 | $375 |

जाहीरातीचे दर

| | US | Can |
|---|---|---|
| पूर्ण पान | $155 | $220 |
| अर्धे पान | $85 | $115 |
| पाव पान | $50 | $70 |
| अष्टमांश पान | $35 | $45 |

- वृत्त दर महिन्यास प्रसिद्ध होते
- प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक मंडळ सहमत असतेच असे नाही
- लिखाणाच्या निवडीचे आणि बदलाचे अंतिम अधिकार संपादक मंडळाकडे राहतील
- पाठवलेल्या साहित्याची पोच ई मेल कळविल्यास दिली जाईल
- साहित्य परत पाठवले जात नाही (पोस्टेज पाठवलेत तरी)

बृहन्महाराष्ट्र मंडळाची कार्यकरिणी
(२००५-२००७)
अध्यक्षः जगदीश वासुदेव, प्रिन्सटन्, न्यू जर्सी
कार्यवाहः कल्पना निमकर, कान्सास सिटी,
कोषाध्यक्षः गिरीश ठकार, पिटस्बर्ग,
सभासदः जगन्नाथ वाणी , कॅलगरी, कॅनडा
माणिक राणे, सिॲटल, वॉशिंग्टन
आशिष चौघुले, होकेसिन, डेलावेअर
किरण जोगळेकर, फिलाडेलफिया
नीला इनामदार, न्यू यॉर्क
माजी अध्यक्षः श्री ठाणेदार, सेंट लुईस
MAIYTRA मैत्र प्रतिनिधीः
लक्ष्मी भार्गवे, शिकागो
lakshmib.maiytra@gmail.com

प्रकाशक
बृहन्महाराष्ट्र मंडळ, उत्तर अमेरिका
26 Rocky Hill Road, Princeton NJ 08540
jvasudev15@yahoo.com
www.bmmonline.org


# संपादकीय

*बृ. वृत्ताच्या सुरवातीपासून दर अंकात संपादकीय लिहिण्याची प्रथा होती. गेली काही वर्षे ते थांबले. त्या ऐवजी बृ. मंडळाचे अध्यक्ष 'अध्यक्षीय' लिहू लागले. वृत्त हे बृ. मंडळाचे मुखपत्र असल्याने संस्थेतील सभासदांशी संवाद करण्याची ही पद्धत योग्यच आहे. आज काही विशेष कारणाने या संपादकीयाचे प्रयोजन.*

*जानेवारी २००४ मध्ये सध्याच्या संपादक मंडळाने वृत्ताची जबाबदारी अंगावर घेतली ती तात्पुरत्या कारणासाठी. २००५ साली मंडळाची नवीन कार्यकारिणी अस्तित्त्वात आली तेव्हा सध्याच्या संपादक मंडळाने काम चालू ठेवावे अशी विनंती करण्यात आली म्हणून संपादक मंडळावरील आम्ही तिघे काम करीत राहिलो. परंतु आता या कामात थोडा खांदेपालट हवा असे वाटू लागले आहे. कारण नोकरीवरील जबाबदाऱ्यांमुळे वृत्ताच्या कामाला पूर्ण न्याय देता येत नाही व वृत्त आणखी चांगले करण्याच्या अनेक योजना मनातच राहतात. दर महिन्याला वृत्त प्रसिद्ध करण्याची जबाबदारी आमचा सर्व फावला वेळ घेते व इतर काही करता येत नाही याची पण खंत वाटत राहते. म्हणून तीन वर्षानंतर नवीन मंडळींनी या कामाची जबाबदारी स्वीकारावी असे आम्हाला वाटते.*

*जुलै २००७ मध्ये नवीन कार्यकारिणी अस्तित्त्वात येईल व ती नवीन संपादक मंडळाची नेमणूक करेल. त्याचा अर्थ आम्ही लेखन पूर्णपणे थांबवणार असा मुळीच नाही. नवीन संपादक मंडळाच्या धोरणानुसार आम्ही वेळोवेळी लिहीत राहू.*

*वृत्त संपादित करण्यात अनेक आव्हाने असतात. वाचक कोण हे सतत ध्यानात ठेवून त्याची आखणी करावी लागते. आमचे बहुतांश वाचक पन्नाशीच्या आसपास आहेत. तरूण वाचकांसाठी वृत्त इंटरनेटवर उपलब्ध करावे असे काहींचे म्हणणे आहे. त्याने वाचक संख्या नक्की वाढेल. मुख्य प्रश्न आहे लेखकांचा. कथा, काव्य लिहिणारे लेखक सापडतात, परंतु वृत्तपत्राला साजेसे लेखन करणे कमीजणांना जमते. वृत्ताची वाचकसंख्या वाढवायची असेल तर असे लेखक शोधणे व तयार करणे हे नवीन संपादक मंडळापुढे प्रमुख काम असेल.*

*ही सर्व धडपड मराठी भाषेवरील प्रेमापायी. भारतातील नविन पिढीचे शालेय शिक्षण इंग्रजी भाषेत होत आहे. पण असे असले तरी महाराष्ट्रात मराठी वृत्तपत्रे चांगली चालत आहेत. त्यामुळे वृत्ताला अजून काही वर्षे तरी नक्की चांगले दिवस आहेत असे मानण्यास जागा आहे. एच वन व्हिसावर येथे येणाऱ्या पिढीने साथ दिली तर पुढील वाटचाल आशादायक असेल.*

*वाचकांच्या प्रतिसादाने आमचा हुरूप टिकला. त्याबद्दल सर्वांचे अत्यंत आभारी आहोत. तेव्हां मधून मधून का होईना भेटत राहू असे आश्वासन नक्की देतो.*

**मोहन रानडे, विद्या हर्डीकर सप्रे, मधुवंती भाट**
*संपादक मंडळ*

## Seattle Convention Youth Programs

Here is a glimpse of what all is arranged.

**Ice breakers**: Meet and mingle with marathi youths, play some games and name new friends.
**Seattle duck tour**: Soak all the sun and enjoy the Vistas of the city from this fun amphibian vehicle.
**EMP Party**: Bollywood blowout - It's wacky, its crazy, it's an icon of the emerald city. Rock to the latest music at the splendid Sky Church room at EMP.
**Seven stars of Hinduism**: Learn about the fundamentals of Hinduism. The oldest religion in the world.
**Yoga for managing stress and total health**: A soulful beginning of the day with Yoga demonstrations learn some simle aasans and breathing techniques
**Speed dating**: Make this BMM a beginning of lifelong relationships. Meet Marathi youth from all over the country.
**Gulab Jam** (Presented by Manisha, Amit and Rajiv): A delicious treat of music and comedy to conclude the convention.

# Busieness Conference Program

## Keynote

Dr. Dinesh Keskar,
*SVP Sales, Boeing Commercial Airplanes*

## Speakers

Ajit Nazre,
*Partner, Kleiner Perkins Caufield and Byers*

Dr. Anand Deshpande,
*Founder Chairman, Persistent Systems*

Geoff Davis,
*CEO, Unitus*

Heather Secrest,
*CPA, International Executive Services, KPMG*

Kal Raman,
*CEO, InfiLearn*

Mak Agashe,
*GM, Microsoft*

Param Parameswaran,
*Chairman, Sulekha.com*

Raghav Kher,
*CEO, Seventymm.com*

Rajiv Jalota,
*IAS, CEO, Maharashtra Industrial Development Corporation*

Samir Bodas,
*President, Aztecsoft*

Shantanu Surpure,
*Managing Attorney/Advocate - Sand Hill India Advisors*

Dr. Sudesh Kothari,
*CEO, Creative Gene Therapeutics Corporation*

Andrew T. Foster,
*Portfolio Manager, Director of Research, Matthews International Capital Management LLC*

Ganesh Iyer,
*Director of Business Development, MDS Pharma Services*

Dr. Hannah Kettler,
*Ph.D., Program Officer-Policy and Finance,Global Health Advocacy, Bill and Melinda Gates Foundation*

Maha Ibrahim,
*General Partner, Canaan Partners*

Neeraj Bhargava,
*Group CEO, WNS*

Pradeep Singh,
*Founder, Aditi Technologies*

Raj Judge,
*Partner, Wilson Sonsoni Goodrich and Rosati*

Sanjaya Joshi,
*President, Userspace Corp.*

Sandeep Shrivastava,
*Managing Partner, Indus Funds I, LP*

Suchitra Joshi,
*Manager, Competitive Technology Labs at IBM*

Sumir Chadha,
*Managing Director, Sequoia Capital India*

# CME Program

Welcome by CME Committee.

Session 1 -Botox in Neurology

Session 2 -Role of Interventional Radiology in primary care

Visit to Exhibits

Session 3 -Recent Advances in field of Asthma and Allergy

Session 4 - Metabolic Syndrome

Session 5 -Ophthalmic Emergencies in primary Care

Non CME Lunch and Speaker program- Osteoporosis updates
Visit to Exhibits

Session 6 -Recent trends in treatment of GERD0

Session 7 -Bioterrorism- Iraq war experiences

Session 8 -Recent advances in Heart failure treatment

Closing remarks

## अधिवेशनाचे देणगीदार

*कोणताही मोठा कार्यक्रम निव्वळ तिकिट विक्रीच्या उत्पन्नावर निभावून नेता येत नाही. त्याच्या जोडीला देणगीदारांची नितांत आवश्यकता असते. सिॲटलचे अधिवेशन्ही त्याला अपवाद नाही. कन्व्हेंन्शन सेंटरचे भाडे, जेवणाचे कॉन्ट्रॅक्ट अशा प्रकारचे अनेक मोठे खर्च भागविण्यासाठी देणग्यांची जरूरी भासते. मराठी माणसाबद्दल गैरसमज काहीही असले तरी तो चांगल्या कार्याला नेहमीच सढळ हाताने मदत करतो हा अनेक वर्षाचा अनुभव आहे. सिॲटल अधिवेशन समितीने ६ देणग्यांचे गट करून प्रत्येक गटाला काही सवलती जाहीर केल्या होत्या. स्थानिक लोकांनी अर्थातच देणग्यातील सिंहाचा वाटा उचलला ही बाब निश्चितच स्पृहणीय आहे. उद्योजक व व्यक्ती यांनी दिलेल्या प्रतिसादाची वर्गवारी अशी.*

*१०,००० डॉलर्स किंवा अधिक - ७ उद्योजक व ३ व्यक्ती*
*५ ते १०,००० डॉलर्स - ६ उद्योजक व ९ व्यक्ती (त्यातील ७ सिॲटलमधील),*
*२५०० ते ५,००० डॉलर्स - १ उद्योजक व ११ व्यक्ती (त्यातील ५ सिॲटलमधील)*
*१००० ते २.५००० डॉलर्स - १ उद्योजक व १०३ व्यक्ती (त्यातील ४० सिॲटलमधील)*
*५०० ते १,००० डॉलर्स - १० उद्योजक व २३ व्यक्ती (त्यातील १६ सिॲटलमधील)*
*१०० ते ५०० डॉलर्स - १ उद्योजक व ६ व्यक्ती (त्यातील ५ सिॲटलमधील)*

*देणगीदारांची संपूर्ण यादी* ***www.bmm2007seattle.org*** *या वेबसाईटवर पहा.*

## ॲरिझोना विद्यापीठाचा पुरस्कार मुग्धा अलूरकर यांना जाहीर

अमेरिकेतील ॲरिझोना विद्यापीठाचा उत्तम प्राध्यापक पुरस्कार नुकताच मुग्धा अलूरकर (येवलेकर) यांना जाहीर झाला आहे. मूळच्या पुण्याच्या असलेल्या मुग्धा अलूरकर यांचे शिक्षण "नूमवि' आणि "स. प. महाविद्यालया'त झाले. राज्यशास्त्रामध्ये विशेष नैपुण्यासह सुवर्णपदक प्राप्त केल्यानंतर उच्च शिक्षणासाठी त्या कॅनडाला रवाना झाल्या. "सकाळ फाउंडेशन'तर्फेही त्यांना शिष्यवृत्ती मिळाली होती. २३ जणांमधून उत्तम प्राध्यापक म्हणून त्यांची निवड झाली असून, विद्यार्थी संवादकौशल्य, विषयाचे सखोल ज्ञान, व्यक्तिमत्त्व, भाषाप्रभाव अशा कसोट्यांवर त्यांना हा पुरस्कार जाहीर झाला आहे. ॲरिझोना विद्यापीठात राज्यशास्त्र, हिंदी, संस्कृत या विषयांचे अध्यापन करतानाच, त्या पीएच.डी.ही करीत आहेत.

**पुढील अंकात -**
*सिॲटल अधिवेशनाचा वृत्तांत नवीन कार्यकारिणीची ओळख २००९ सालचे अधिवेशन कोठे भरणार? पुस्तक परिचय, व्यक्ति परिचय व इतर नेहमीची सदरे.*
*जुलै अखेर प्रकाशित होईल.*

**बृहन्महाराष्ट्र वृत्त**
**जाहीरातीसाठी उत्तम माध्यम, माफक दर**

## Prakash and Manda Amte 's Itinerary

There is an overwhelming response for programs of Prakash and Manda Amte in North America. So far the following 19 cities have confirmed engagements. The dates, cities and contact phone numbers are given below. If you would like to know any additional information, you may contact Jagannath Wani by phone at (403) 288-0048 or by email at wani@ucalgary.ca

16 June - Toronto (Shashikant Shete 905-403-8058)
21 June - Saskatoon (Sunil Choubal 306-242-0637)
23 June - Calgary (Jagannath Wani 403-288-0048)
27 June - Kelowna (Murli Pendharkar 250-765-2842)
30 June - Seattle (BMM Convention)
1 July - Seattle (Niranjan Benegal 206 522-4404)
6 July - Edmonton (Jivan Kayande 780-459-3852 & 886-1641)
12 July - Marshfield, WI (Hemender Singh 715-305-8500
14 July - Kansas (Kalpana Nimkar 913-393-0484)
15 July – Atlanta (Raja Phatak 678-494-4598)
21 July - San Jose (Govind Desale 408-245-5298 & 857-1748)
22 July - Los Angeles (Anuradha Ganu 951-279-8870)
28 July - Houston (Viju Bhadkamkar 281-647-9292)
29 July - Dallas (Subash Gaitonde 972-267-5342)
4 August - Orlando (Kishor Pathare 321-452-0264 & 960-5497)
5 August – Raleigh (Dipti Damle 919-367-9386)
9 August - Allentown (Gul Asnani 610-398-1879 & 462-8924)
11 August - New Jersey (Jagdish Vasudev 732-355-1515)
12 August - Washington (Mayur Dewal 301-367-2551)




तुम्ही घर घ्यायचं आणि निर्धास्त व्हायचं.

मायदेशात घर घेताना तुमच्या डोळ्यासमोर असलेली असंख्य स्वप्नं, कुठल्याही काळजीचं ग्रहण न लागता पुरी होणारच याची आता खात्री बाळगा. अगदी घराच्या निवडीपासून देखभालीपर्यंत प्रत्येक टप्प्यावर आम्ही तुमच्या साथीला आहोत. उत्तमोत्तम डीएसके प्रकल्पातून मनाजोगतं घर निवडायला तुम्हाला योग्य मार्गदर्शन तर मिळेलच. शिवाय तुम्ही नसताना तुमच्या घराची संपूर्ण देखभाल आम्ही करू. भाड्याने द्यायची किंवा पुन्हा विकायची इच्छा असेल तर मदत आणि नियमितपणे कर भरण्याची व्यवस्थाही करू. तेव्हा तुमच्या सर्व चिंता काळज्यांचं ओझं आमच्यावर सोपवा आणि निर्धास्तपणे आनंद लुटायला सज्ज व्हा!

सर्वोत्तम लोकेशन्स, सर्वगुणसंपन्न घरं
• डीएसके **गार्डन एन्क्लेव्ह**, कोंढवा, पुणे • डीएसके **सुंदरबन**, हडपसर, पुणे • डीएसके **फ्रँजिपनी**, कँप, पुणे

DSK
घराला घरपण देणारी माणसं®

डी.एस.कुलकर्णी डेव्हलपर्स लि.
AN ISO-9001, 14001, OHSAS 18001 COMPANY
डीएसके हाऊस, जंगली महाराज रोड, शिवाजीनगर, पुणे 411 005. फोन : **6604 7100** टेलि-इन्फोसाठी : **020 - 6604 7181**
१४, उपासना, एल जे रोड, सेनाभवन जवळ, शिवाजी पार्क, मुंबई 400 016. फोन : **022 - 2432 4328**
• **E-mail:** sales@dskdl.com • **Web Site:** www.dskdl.com
pratisaad.com 06/772

# Presidential Scholar
# Prateek Bhide



U.S. Secretary of Education Margaret Spellings announced on May 2, the selection of Prateek S. Bhide, of Beaverton, Ore., who attends Westview High School in Portland, as a 2007 Presidential Scholar. Prateek is one of 141 outstanding American high school seniors that have demonstrated exceptional academic achievement, artistic excellence, leadership, citizenship, and service at school and in their community. The Presidential Scholars will be honored for their accomplishments in Washington, D.C., from June 23 to 27.

"The 2007 Presidential Scholars represent the great gift we have in our nation's youth," Spellings said. "Their academic achievement and their spirit of leadership and service will ensure their success in the 21st century knowledge economy. They exemplify the standard of excellence that we are striving for in all our schools across the United States, and their skills, energy and innovation will enable America to set a competitive pace in our changing world."

Prateek has served as senior representative of the Kiwanis Key Club, project coordinator for the National Honor Society, president and treasurer for the Health Occupations Students of America, co-captain of the varsity tennis team, and committee head of Model United Nations. He plays the piano and is a multiple Oregon Music Teachers Association award winner. He has worked as a lab assistant at Portland State University's Mechanical Engineering Department and he is a member of the Mayor's youth advisory board. He volunteers at a local hospital.

The 141 Presidential Scholars include one young man and one young woman from each state, the District of Columbia and Puerto Rico, and from U.S. families living abroad, as well as 15 chosen at large and 20 Presidential Scholars in the Arts. A 27-member Commission on Presidential Scholars appointed by President Bush selected the Scholars based on their academic success, artistic excellence, essays, school evaluations and transcripts, as well as evidence of community service, leadership, and demonstrated commitment to high ideals.

For the past 43 years, this prestigious program has honored over 5,000 of the nation's top-performing students. Of the three million students expected to graduate from high school this year, over 2,700 candidates qualified on the basis of outstanding performance on the College Board SAT and ACT exams, or by nomination through the nationwide Young Artsâ talent search conducted by the National Foundation for Advancement in the Arts.

The Presidential Scholars program was created in 1964 to honor academic achievement. It was expanded in 1979 to recognize students who demonstrate exceptional talent in the visual, literary and performing arts.

Since 1983, each Presidential Scholar has invited his or her most inspiring and challenging teacher to travel to Washington, D.C. to receive a Teacher Recognition Award from the U.S. Department of Education and to participate in the recognition events.

The teacher chosen for recognition by Prateek was David Wilkinson, of Portland, Ore.

Prateek's profile includes outstanding scores such as SAT: 2350, ACT: 35, Class Rank: 3/615, GPA: 4.0 (UW)/4.347 (W), took 12 AP classes, SAT IIs: Biology-E (770), Chemistry (800), Math IIC (800), U.S. History (730), APs: 5 on Biology, Calculus AB, U.S. History, U.S. Government/Politics, Chemistry, English Language and Composition.

Prateek is the son of Sandhiparakash and Anjali Bhide of Portland, OR.

Hearty congratulations to Prateek and best wishes for the outstanding future!

Editors,
BMM Newsletter


**— जन्मकुंडली मार्गदर्शन —**

*लहान मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी, त्यांच्या जीवनाचे अपेक्षित शिल्प प्रयत्नपूर्वक घडण्यासाठी व इतरांच्या जीवनातील नोकरी, व्यवसाय, विवाह, संतती, आरोग्यविषयक व अन्य समस्यांसाठी जन्मकुंडली मार्गदर्शन हवेच! अनेकांनी लाभ घेतला, आपणही त्यासाठी संपर्क साधा.*

*dadadamle@hotmail.com*
*Phone: 201-760-9748*

**COMFORT TRAVEL**
ARC **EDISON, NJ** IATA

**Alaska cruise & tour group leaving for 7 nights before & after BMM Convention**
**SOTC tours/Cox & Kings to Europe**
**eMail: comforttrvl@netscape.net or comforttrvl@yahoo.com**
**Please call - SHAILA SHIRVALKAR**
**TEL: 732-767-3135**
**FAX: 732-767-3138**

# सिॲटल अधिवेशनाचा कार्यक्रम

| | मुख्य सभागृह | समांतर रंगमंच – मिनिमी सभागृह – म्युझिक रूम |
|---|---|---|
| **शुक्रवार, २९ जून २००७** | | |
| सकाळी ७.३० ते ९ | न्याहारी व स्टॉल्सना भेट देण्यासाठी वेळ | |
| सकाळी ९ ते १२ | १.उद्‌घाटनाचा समारंभ – सादरकर्ते – शिकागो, सिॲटल व सॅन होजे मंडळांचे कलाकार, २. डॉ. जब्बार पटेल यांचे भाषण | |
| दुपारी १२ ते २ | भोजन व स्टॉल्सना भेट देण्यासाठी वेळ | |
| दुपारी ३ ते ६ | १. प्रथम क्रमांक विजेती एकांकिका – मनोमिलन, सादरकर्ते – थिएॅट्रिक्स, न्यू जर्सी २. क्रीडारंजन – मल्लखांब प्रात्यक्षिके ३. द्वितीय क्रमांक विजेती एकांकिका – साठेचं काय करायचं? सॅन होजेचे कलाकार ४. सुधीर गाडगीळ – मधुर भांडारकर यांची मुलाखत घेतील | १. सांवर रे – सादरकर्ते – कला, सॅन होजे २. युवा मैफल – अंजली जोशी, संपदा भालेराव, संजीव कारंदे ३.बासरी वादन – प्रदीप खळदकर ४. शास्त्रीय गायन – मधुवंती भिडे, ५. भजन – श्रीवाणी जडे, शरद गद्रे, सामी साल ६. गायन – कुमुद नगरकर ७. महाराष्ट्र फाउंडेशन – विद्या बाळ, दीपा श्रीराम ८. सेवन स्टार्स ऑफ हिंदुइझम – दिलिप थत्ते ९. शांता शेळके यांची साहित्यिक वाटचाल |
| संध्याकाळी ६ ते ८ | भोजन व स्टॉल्सना भेट देण्यासाठी वेळ | |
| रात्री ८ ते १० | मम आत्मा गमला – आशा खाडिलकर, सुरेश बापट, नीलाक्षी पेंढारकर, सचिन व सुप्रिया पिळगांवकर, रविंद्र साठे, साथ – स्वराली ग्रुप – सिॲटल | |
| **शनिवार, ३० जून २००७** | | |
| सकाळी ७.३० ते ९ | न्याहारी व स्टॉल्सना भेट देण्यासाठी वेळ | |
| सकाळी ९ ते १२ | १. डॉ नरेंद्र जाधव – भाषण, २. अैलतीर – पैलतीर – सादरकर्ते – थिएॅट्रिक्स, न्यू जर्सी | १ वाद्यवृंद – मंदार जोग २ गायन – जुई टेंभेकर ३ २०२० सालचा भारत – अविनाश धर्माधिकारी |
| दुपारी १२ ते २ | भोजन व स्टॉल्सना भेट देण्यासाठी वेळ | |
| दुपारी ३ ते ६ | १.स्त्री रंग – विजया राजाध्यक्ष, झेलम परांजपे, आश्विनी भिडे, २. गायन – महेश काळे ३. उस्ताद झाकिर हुसेन – रिदम रापसोडी | १. चरपट मंजिरी – मंजिरी धामणकर, २. भारतीय समूह नृत्ये – गीता केणी, ३. अष्टनायिका – सुप्रिया पुराणिक ४. When world views collide – परिसंवाद – माधुरी बापट, लतिका मंगरूळकर, सुशील करमरकर, अनु महाबळ, श्रीनिवास माटे, विजया बैलूर ५. परि तुझ्यावाचून करमेना – मराठी साहित्यिक कृतींवर आधारित कार्यक्रम ६. गायन – अरूण द्रविड ७. गायन – विनिता गंगोळी, ८. संतूर वादन – मदन ओक ९. मला समजलेली मराठी संस्कृती – प्रियंका टोपे १०, गायन – सीमा हनामसागर ११. Successful Aging Seminar conduced by New Americans of New Jersey. १२. सेतुला टेकू – स्टॅन्ड अप कॅामेडी– उत्तर अमेरिकेतील कलाकर |
| संध्याकाळी ६ ते ८ | भोजन व स्टॉल्सना भेट देण्यासाठी वेळ | |
| रात्री ८ ते १० | नाटक – हे राम कार्डिओग्राम – लेखक – संजय मोने – दिग्दर्शक – विजय केंकरे – कलाकार – अशोक व सुप्रिया सराफ, राजन भिसे, विनय येडेकर, मुक्ता बर्वे | |

कार्यक्रम व जेवणाच्या मेनूत बदल करण्याचे अधिकार अधिवेशन समितीला आहेत.

# सिॲटल अधिवेशनाचा कार्यक्रम

| | मुख्य सभागृह | समांतर रंगमंच – मिनिमी सभागृह – म्युझिक रूम |
|---|---|---|
| **रविवार, १ जुलै २००७** | | |
| सकाळी ७.३० ते ९ | न्याहारी व स्टॉल्सना भेट देण्यासाठी वेळ | |
| सकाळी ९ ते १२ | १. बृ. मंडळाची निवेदने<br>२. समारोपाचा कार्यक्रम – सूर पश्चिमेचे – सादरकर्ते – उत्तर अमेरिकेतील कलाकार, निर्माता – मोहन रानडे, सूत्रधार – मधुरा गोखले | १. तृतीय क्रमांक विजेती एकांकिका – नवरा विकणे आहे<br>२. गायन – संदीप रानडे |
| दुपारी १२ | भोजन | |

# सिॲटल अधिवेशनातील जेवणाचा मेनू

| | |
|---|---|
| **शुक्रवार, २९ जून २००७** | |
| सकाळी ७.३० ते ९ | न्याहारी |
| | कांदा पोहे, शिरा, सिरियल, बेगल व क्रीम चीज, केशरी पेढा, ऑरेंज ज्युस, फळे, चहा, कॉफी |
| दुपारी १२ ते २ | **दुपारचे भोजन** |
| | मेथी चिकन, मिक्स रस्सा, बटाट्याची भजी, चपाती, टोमॅटो कोशिंबिर, पंचामृत, भात, फ्रुट सॅलड, सुके पान |
| दुपारी ४ | **चहा** |
| | चकली, चहा, कॉफी, ग्लुकोज बिस्किटे, पन्हे |
| संध्याकाळी ६ ते ८ | **रात्रीचे भोजन** |
| वरण भात, मसाले भात, बटात्याची सुकी भाजी, मिक्स उसळ, काकडीची कोशिंबीर, मिक्स भजी, चपाती, पुरण पोळी, सुके पान | |
| **शनिवार, ३० जून २००७** | |
| सकाळी ७.३० ते ९ | **न्याहारी** |
| | उपमा, साबुदाणा खिचडी, सिरियल, बेगल व क्रीम चीज, ऑरेंज ज्युस, फळे, चहा, कॉफी |
| दुपारी १२ ते २ | **दुपारचे भोजन** |
| झुणका पिठले, मक्याची भाकरी, भेंडी फ्राय, मसूर आमटी, गोअन फिश करी, सोलकढी, कोबीची पचडी, ओल्या नारळाची करंजी, सुके पान | |
| दुपारी ४ | **चहा** |
| | बटाटा चिवडा, शंकरपाळे, चहा, कॉफी, ग्लुकोज बिस्किटे, कोकम सरबत |
| संध्याकाळी ६ ते ८ | **रात्रीचे भोजन** |
| भरली वांगी, आमटी, वाटली डाळ गाजराची कोशिंबीर, बटाट्याचे व पोह्याचे पापड, कोल्हापुरी चिकन रस्सा, पुरी, श्रीखंड, सुके पान | |
| **रविवार, १ जुलै २००७** | |
| सकाळी ७.३० ते ९ | **न्याहारी** |
| | चितळे बाकरवडी, सिरियल, बेगल व क्रीम चीज, ऑरेंज ज्युस, फळे, चहा, कॉफी |
| दुपारी १२ | **दुपारचे भोजन** |
| | वडा पाव सुकी चटणी, पाव भाजी, दही भात, चिकन रॅप, जिलबी, |
| **सर्व दुपारच्या व रात्रीच्या भोजनात** | |
| तूप, दही, कुरडया, मठ्ठा (फक्त दुपारी), चटण्या, सुकी खोबऱ्याची व लसणाची चटणी, लोणची, लिंबाची फोड | |

# पुस्तक परिचय




गारगोट्यांच्या ढिगाऱ्यात अचानक एखादा हिरा गवसावा तसे मला डॉ. श्रीनिवास गोखले यांचे 'आनंदयात्रा' हे पुस्तक पाहून/वाचून वाटले. "पाहून" अशासाठी की हा लेखकाच्या भटकंतीमधील जवळजवळ एकशेचाळीस निवडक छायाचित्रांचा अत्यंतिक देखणा संग्रह आहे. "वाचून " अशासाठी की प्रत्येक सुंदर प्रतिमेला साजेशा इंग्रजी आणि मराठी काव्यपंक्ती हिऱ्याला कोंदण शोभावे तशा समर्पक आहेत. (अनू मराठी कविता लिहीणारी माझी बालमैत्रीण आणि लेखकाची पत्नी – डॉ आसावरी गोखले!)

अगदी पुण्याच्या वेताळटेकडीपासून ते सिंहगड, केरळ, अबूधाबी, हिमालयातील अनेक सौंदर्यस्थळे, नेपाळ, तिबेट अशा विविध ठिकाणी टिपलेली ही स्मृतिचित्रे आहेत. प्रत्येक चित्रचौकट म्हणजे एकेक काव्यात्म सौंदर्यानुभव आहे. पाने उलटताना आपण जवळजवळ प्रत्येक पानापाशी थबकतो. चित्रविषयाची आकर्षक मांडणी, अतिशय उठावदार , नैसर्गिक प्रकाशयोजना, नैसर्गिक वैभवशाली रंग, मनुष्यकृतींचा सुयोग पण परिणामासाठी केलेला माफक उपयोग यांची मेजवानीच डोळ्यांना मिळते.

झाडे म्हणजे लेखकाचे सखेसोयरेच असावेत. नव्या पालवीचे, फुलांचे शृंगार ल्यालेले वृक्ष, ध्यानस्थ वृक्ष, पर्णविहीन वृक्ष, छायाप्रकाशाच्या खेळामुळे मंदिराच्या गोपुरांसारखे दिसणारे वृक्ष या चित्रचौकटीत प्रामुख्याने दिसतात. फुलांचे, पानांचे, कळ्यांचे किती लावण्यविभ्रम या चित्रांमधे बंदिस्त केलेले आहेत. प्रियजनच असावेत असे पर्वतराज तर पानाआड सौंदर्याचा खजिना रिकामा केलेले मानससरोवराभोवतीचे रूखेसुखे पर्वत हिमलेण्यांनी वृक्षलतांनी सजलेले पर्वत, कोळ्यांच्या जाळ्यावरील मुक्ताहार, क्षणभंगुर संध्याराग, आकाशातील अभ्रफुले, दंवबिंदूतील इंद्रधनुष्ये हे सर्व टिपून घेण्यामागची तपश्चर्या जाणवल्याशिवाय रहात नाही.

छोट्याशा अर्थगर्भ काव्यपंक्ती – मराठी आणि इंग्रजीही – या प्रतिमांना झाकोळून न टाकता अधिक उजळवतातच. उदाहरणार्थ – सूर्यकिरणात न्हालेल्या गोजिऱ्या पानांसाठी

उद्या असू किंवा नसू
आज तरी सोनेरी हसू

किंवा पहिल्याच पानावरील सरोवराच्या पर्वताच्या प्रतिबिंबाने द्विगुणित झालेल्या प्रतिमेसाठी

Which way up and which way down
Heaven on earth or other way around?

किंवा धौलगिरीच्या भव्य निसर्गचित्रासाठी

श्वेत हिमाचे भस्म शिरी
बसे ध्यानमग्न धौलागिरी

अतिशय सुबक बांधणी व सुंदर छपाई हे या पुस्तकाचे आणखी एक वैशिष्ट्य. अगदी सहजपणे आपणही या आनंदयात्रेमधे चालू लागतो. फक्त थोडीशी हुरहुर अशी वाटते की निसर्गाला बंदिस्त करताना डॉ गोखलेंनी माणसांकडे चांगलेच दुर्लक्ष केले आहे. त्यांच्या आनंदयात्रेच्या पुढच्या टप्प्यात थोडे मानवाचेही योगदान असावे असी आशा आहे लेखकाने प्रस्तावनेत लिहिले आहे

"भोवती बऱ्याच सुंदर गोष्टी असतात पण त्यांना एक चौकट दिल्यावर त्या मनाला जास्त भावतात ". या चौकटी निर्माण केल्याबद्दल या त्रयीला अनेक धन्यवाद.

**वीणा शाह**
ब्लूमफिल्ड हिल्स, मिशिगन
*vshah3@hfhs.org*

आनंदयात्रा A Travelogue of Joy
लेखक, प्रकाशक. छायाचित्रकार – डॉ. श्रीनिवास गोखले
काव्यरचना – डॉ. आसावरी गोखले, सौ अंजली कुमार
किंमत – १० डॉलर्स
पुस्तक ऑर्डर करण्यास संपर्क – shindoc40@hotmail.com

---

## ज्येष्ठ नागरिकांचा सुखसोबती

वृद्धावस्था अटळ आहे प्रत्येकजण त्या अवस्थेतून जाणारच आहे साठ वर्षाच्या व त्याहून वयस्कर असणाऱ्या लोकांची पिढी इतर कोणत्याही वयोगटापेक्षा जास्त वेगाने दिवसेंदिवस वाढत आहे समतोल आहार व निसर्गोपचार पद्धतीचा अवलंब केल्यास कार्यक्षम दैनंदिनी वाढत्या वयातही आचरणात आणता येते असे संशोधनात आढळून आले आहे मोठ्या टाईपातील या पुस्तकात २९ लेखांमधून ज्येष्ठ नागरिकांना उपयुक्त ठरेल असे मार्गदर्शन केले आहे

या पुस्तकातील पहिल्या भागात वार्धक्यातील आरोग्य, योगासने व आहार, ध्यानाचे महत्त्व, शांकाहार अधिक चांगला कां?, मोड आलेले धान्य, लसूण व मीठाचे महत्त्व, डोळ्यांचे आरोग्य, अल्झायमर, भयगंड याबद्दल माहिती दिली आहे दुसऱ्या भागात महत्त्वाचे विविध प्रकारचे वैद्यकीय उपचार, कायदेविषयक सल्ला, हेल्पलाईन, महत्त्वाचे दूरध्वनी क्रमांक, मदत केंद्रे, ज्येष्ठ नागरिकांची कामे करणाऱ्या आणि मोफत अथवा अल्प दरात सेवा पुरविणाऱ्या संस्था याबद्दल माहिती आहे त्यात महाराष्ट्रातील ५५ वृद्धाश्रमांचा समावेश आहे.

विद्याधर सहस्त्रबुद्धे
हॅरिसबर्ग, पेनसिलव्हेनिया

ज्येष्ठ नागरिकांचा सुखसोबती
लेखक – वि. गो. भागवत
प्रकाशक – सुयोग प्रकाशन ८०० बॅरिस्टर गाडगीळ पथ,
पुणे ४११ ०३०
दूरध्वनी २४४९ ५५८४

## Looking for a Companion

A retired professional woman from New York - active, athletic and outgoing is looking for a 60+ professional man who enjoys sports and Indian cultural activities for a travel companion.
Please contact
ashalata@optonline.net

# उत्तर रंग

*हे सदर जानेवारी २००४ पासून वृत्तात प्रसिध्द होत आहे. त्याला लोकांचा चांगला प्रतिसादही मिळत आहे. उत्तर रंग या सदराची लोकप्रियता आणि आवश्यकता लक्षात घेऊन हे सदर यंदाही सुरू ठेवले आहे. मात्र या सदरातील लेख दर महिन्याऐवजी दर तीन महिन्यांनी प्रसिध्द केले जातील. या सदरात कोणत्या विषयावरील लेख असावेत, याबद्दलच्या सूचना आम्हाला कळवाव्यात. तसेच आपले विचार आणि लेखही जरूर पाठवावेत. . संपर्कः अशोक सप्रे.(ashok.sapre@verizon.net) विश्वास तडवळकर (vishtad@yahoo.com)*
*विद्याधर सहस्रबुध्दे (mangalasa@juno.com)*

*या सदरात प्रसिध्द झालेले काही लेख आपल्याला पुढील संकेतस्थळावर (वेबसाईटवर) वाचता येतील.*
*www.geocities.com/indoamericansenior/marathi www.geocities.com/indoamericansenior/English*

## शिवभावे जीव सेवा – एक आव्हान

या लेखा व्दारे मला बृहन्महाराष्ट्र वृत्ताच्या उत्तररंग सदराच्या वाचकांना नम्र सूचना करावीशी वाटते. या सदराचे बहुतेक वाचक मित्र सध्यातरी स्वावलंबी व सक्षम आयुष्य जगत आहेत. माझ्या वयाचे निवृत्त वाचक सुध्दा पूर्णपणे परावलंबी वा अंथरूणाला खिळलेले नसावेत असे मला वाटते. तरी सुध्दा त्यांना उत्तररंग काळात काय करावयाच ?, कसे ?, केव्हा ?, असे अनेक प्रश्न वारंवार पडतात. तरी माझ्या मते तशी वेळ यायच्या अगोदरच हा एक मार्ग आहे, त्याचा विचार अवश्य करावा.

त्यांनी इतर गरजूंची सेवा करून स्वधर्माचे पालन केल्यास त्यांना मनःशांती व सुखसमाधान लाभेल व उत्तर रंग काळात अनेक नव-नवीन मार्ग सुचतील, असे मला वाटते. हे सर्व स्वानुभवावर आधारित विचार मी पुढे मांडतोय. त्यात अनेक चुका असण्याची शक्यता आहे व ते सर्वांनाच पटणारही नाहीत, तरी आपण मोठे मन करून मला माफ कराल अशी आशा करतो.

मी १९९८ मध्ये माझी स्वतंत्र सर्जिकल प्रॅक्टिस बंद केली, व रोटरी, रिमोट एरिया मेडिकल व इतर सेवाभावी संस्थांच्या माध्यमातून आजवर ४५ सर्जिकल मोहिमा काढून गरीब आदिवासी जनतेवर ३५०० च्या आसपास मोफत शस्त्रक्रिया केल्या.

समर्थ रामदास स्वामींनी दासबोधातील नरदेह स्तवन या समासात अनेक ओव्यांत जनसेवेतून परमार्थ साधण्याचा उपदेश केला आहे.

नरदेह हा स्वाधैन, सहसा नव्हे पराधैन
परंतु हा परोपकारी झिजऊन, कीर्तीरूपे उरवावा ॥

सध्या जगात श्रीमंती व गरीबीतील तफावत अत्यंत झपाट्याने वाढत आहे. वाढत्या लोकसंख्येसाठी पाणीपुरवठा, शिक्षण, नोकऱ्या, राहणीमान, निवृत्ती, या सर्व गोष्टींची माणसावरील जबाबदारी वाढली आहे. अशावेळी विविध क्षेत्रांतील तज्ञांची व विशेषज्ञांची सेवा फार फार उपयोगी पडेल यात शंका नाही.

असल्या निरपेक्ष सेवेची गंमत अशी की आपण केलेल्या छोट्या मोठ्या जनसेवेच्या फळाची जर अपेक्षा ठेवली नाही, तर एक प्रकारचा निरपेक्ष, चिरकाल टिकणारा आंतरिक आनंद मिळतो. अशा कार्यात नवनवीन प्रसंग, व्यक्ती, आपल्या आयुष्यात येतात व त्यांचे कार्य व अनुभव आपल्या आनंदात भरच घालतात.

आपण सर्व वाचकांनीसुध्दा उत्तररंग काळात जनसेवेसाठी आापला काही वेळ द्यावा व या आनंदाचा आस्वाद घ्यावा अशी माझी सर्वांना कळकळीची विनंती आहे.

डॉ. मद्दीवार यांच्या संस्थेची यापुढील सर्जिकल मोहिम फेब्रुवारी २००८ मध्ये भारतात टिम जिरो, अरूणाचल प्रदेश, येथे जाणार आहे. सेवेच्छुक वाचकांनी लेखकाशी संपर्क साधावा.


**डॉ. गंगाधर मद्दीवार**
152, Daniels Creek, Banner, KY 41603
e mail ganmad@rocketmail.com
Tel. 606 874 9946
www.ramusa.org


## *MARK YOU CALENDAR AND PARTICIPATE in a Seminar at the upcoming BMM Convention!!*

A 90-minutes Seminar on "SUCCESSFUL AGING" is planned in the afternoon of the first day of the BMM Convention, June 29, 2007. It will address the following four topics:

**1. Housing: Issues, Options and Opportunities.**
This topic will cover pros and cons of moving into a retirement community, timing for making decisions, financial considerations, types of communities, communities in USA and India etc...

**2. Uttar Rang: Time to Give.... and Take.**
This topic will discuss ways for making one's life purposeful, productive and interesting even in senior years. It will explore opportunities for volunteering in USA and India. Also, it will emphasize the importance of taking time out to pursue your personal goals and interests.

**3. Recipe for Graceful Aging "CLUB 55":** This topic will focus on planning for issues that are likely to come for singles and/or couples in their senior years.

**4. In Search of Peace of Mind in Golden Years:** This topic will cover what we must begin to do now to prepare in a balanced way for physical, emotional and financial well being as we age.

**Ashok and Vidya Sapre from California, Avinash and Meena Deshpande from New Jersey, and Ashok and Maneesha Gore from California along with BMM President Jagdish Vasudev will facilitate the Seminar.**

For the last two years two-day Conferences were held on this topic, in California in 2005 and in New Jersey in 2006. This Seminar is a mini version of this years Conference.

नुकतेच प्रकाशित झालेले
महाराष्ट्र टाईम्सच्या सर्वाधिक खपाच्या यादीतील पुस्तक

## ब्रश माइलेज




एका प्रथितयश चित्रकाराची कलात्मक वाटचाल

**लेखक - रवी परांजपे**

प्रकाशक राजहंस प्रकाशन, पुणे.
पृष्ठसंख्या २४५, किंमत १५ डॉलर्स (पोस्टेजसह)
खरेदीसाठी संपर्क:
sharpara@gmail.com

**SAVE DISABLED CHILDREN THRU FREE PLASTIC SURGERY**





**PLEASE DONATE GENEROUSLY TO DR. DICKSHEET'S INDIA PROJECT**
**WWW.DRDICKSHEET.ORG**

**135 OCEAN PARKWAY 17C**
**BROOKLYN, NY 11218**
**PH. 718 633 1449 or 727 868 1667**
**E mail: murphy.pianoman@att.net**
***YOUR DONATION OF $150 CAN SAVE ONE CHILD***





## एक वेगळा इतिहास ...तुमचा आमचा

पाहुण्यांना न्यू यॉर्कजवळील एलीस आयलंड दाखवायला घेऊन गेलो की २०व्या शतकात युरोपातून बोटीने आलेल्या इमिग्रंटसच्या सेपिया रंगाच्या छायाचित्रापुढे मी नेहमी थबकतो. हातात जुनी बॅग अथवा एखादे गाठोडे, रस्ता चुकल्याचा, भविष्याबद्दल अत्यंत काळजी वाटत असलेला डोळ्यात भाव असा असंख्य स्त्री, पुरूष व मुलांच्या समुदायाचे ते चित्र पाहिले की ते चित्र क्षणभर मला माझेच वाटते. पण क्षणभरच. कारण चेहेऱ्यावरील भाव तेच असले तरी तुम्ही आम्ही अगदी वेगळ्या परिस्थितीत या देशात पहिले पाऊल ठेवले असे लगेच लक्षांत येते.

मी ३३ वर्षापूर्वी न्यू यॉर्क विमानतळावर पोचलो तेव्हां कधी तोंड न पाहिलेल्या एका मराठी मित्राच्या मित्राचा चेहरा शोधत होतो. शेवटी तो सापडलाच नाही व विमानतळावर दुसऱ्या कोणाला न्यायला आलेल्या एका भारतीयाने माझी स्थिती ओळखून मला घरी नेले. त्यावेळी त्याचा कुणी फोटो काढला नाही. अशा असंख्य आगमनांची कुठे नोंद झाली नाही. माझा अनुभव हा थोडाफार फरकाने आपला सर्वांचा. त्यानंतर येथे स्थायिक होणे हे पण असेच घटनापूर्ण. एलिस आयलंडमधे असलो की हा गेल्या ४० वर्षाचा इतिहास कोण लिहिणार? आपली पिढी हयात असताना ते घडण्याची शक्यता किती? असे प्रश्न माझ्या मनात यायचे. भारतातून आलेले कुणी ऐकणारे भेटले की त्याला भडभडून सांगायचो.

पण माझ्यासारखाच हा प्रश्न बृ. मंडळाचे माजी अध्यक्ष श्रीनिवास ठाणेदार यांना पडला व त्यांच्या कारकिर्दीत त्या प्रश्नाला त्यांना उत्तर सापडले. भारतातील नवोदित व तरूण लेखिका अपर्णा वेलणकर हिच्यावर हा इतिहास अभ्यासण्याची व लिहिण्याची जबाबदारी त्यांनी टाकली, त्यासाठी आर्थिक सहाय्य दिले. अपर्णाने काही महिने अमेरिकेत वास्तव्य करून अनेक जणांच्या मुलाखती घेतल्या. मध्यंतरी या पुस्तकाचे काम थंडावले होते पण अधक्ष जगदीश वासुदेव यांच्या प्रयत्नाने हे काम पुरे झाले. आता १९६० सालच्या दशकात अमेरिकेत आलेल्या मराठी समाजाचे हे अनुभव पुस्तक रूपाने सिॲटल अधिवेशनात प्रसिद्ध होत आहेत.

अपर्णाला वृत्तपत्र लेखनाचा अनेक वर्षाचा अनुभव आहे. तिला अरूधंती रॉयच्या “The God of Small Things” या पुस्तकाच्या भाषांतराला साहित्य अकदमीचा पुरस्कार मिळाला होता. पण स्वतंत्र विषयावरील हे तिचे पहिले पुस्तक आहे. पहिल्याच प्रयत्नातील तिची कामगिरी अत्यंत वाखाणण्याजोगी आहे.

हे पुस्तक पुण्याच्या मेहेता प्रकाशन संस्थेतर्फे प्रकाशित होत आहे. मूळ किंमत १० डॉलर्स असून ते अधिवेशनात सवलतीच्या किंमतीत ५ डॉलर्सला उपलब्ध असेल. इतरांनी ई मेलने पुस्तकाची ऑर्डर बृ. मंडळाकडे नोंदवावी.

**मोहन रानडे** ***editorbmm@yahoo.com***

**पूर्वीच्या अधिवेशनातील कार्यक्रमांच्या डीव्हीडी**
**ॲटलांटा**

डॉ. माशेळकर यांचे भाषण - १० डॉलर्स ,
उद्‌घाटनाचा कार्यक्रम - १२ डॉलर्स, वेस्टर्न घाटस - १२ डॉलर्स
हृषिकेश रानडे, बेला शेंडे - सुगम संगीत - १२ डॉलर्स
शिपिंग ३.५० डॉलर्स ऑर्डर करण्यास १-८००-३००-६४३० फोन करा

# शेवटचे पान

मेमोरियल डे होऊन गेला म्हणजे अमेरिकेतील उन्हाळ्याला सुरूवात झाली आणि उन्हाळा म्हटला की सुट्टी आलीच. भारतात सुट्टीचे दिवस एप्रिल अखेर सुरू होतात (म्हणजे व्हायचे, आता पेपर फुटीपासून राजकीय असंतोषापर्यंत अनेक कारणांनी परिक्षा पुढे ढकलल्या जातात त्यामुळे सुट्टी कधी सुरू होईल याची खात्री देता येत नाही). भारतातील मंडळी सुट्टीला आता दरवर्षी नवीन ठिकाणी जातात. पण मी लहान होतो तेव्हां उन्हाळ्याच्या सुट्टीत बहुधा आमच्या घरी पुण्यालाच नातेवाईक जमायचे. त्यावेळी बहुतेक महिला नोकऱ्या करीत नव्हत्या तर पुरूषांना सुट्टी मिळत नाही असे कधी होत नव्हते. त्यामुळे नात्यातील मामा, काका, आत्या, मावशा व त्यांचे कुटुंबीय सुट्टीला आमच्या घरी आले की घर भरून जाई.

त्यावेळी शाळेला सुट्टी म्हणून मुलांपेक्षा महिलाच जास्त आनंदात असत. घरी असले की मुलांची सर्व जबाबदारी महिलेवरच पडायची. मात्र सुट्टीला जेथे जायचे तेथे इतर मुले असत व त्या घोळक्यात आपले मूल सोडले की काम होत असे. मुलांची दोन वेळा पोटाची सोय केली की  दिवसभर ती  कुठे उंडारतात याची त्यांना चिंता नसे. घरातील महिलेला आलेल्या पाहुण्या महिला मदतीला असल्याने तिला स्वयंपाकाचा बोजा वाटत नसे.

पुण्याला आम्ही एकत्र जमलो की मुले विटी-दांडू, क्रिकेट तर मुली लगोरी, लपंडाव असे खेळ खेळण्यात व सायकल चालविण्यात दिवस घालवायचो. दोन वेळा जेवायला फक्त घरात तोंड दाखवायचे. काही वेळा घरातील मोठ्या व्यक्तीला दुपारच्या जेवणानंतर 'मुलांनो, बाहेर उन फार आहे, सगळेजण थोडावेळ झोपा' अशी ऑर्डर सोडण्याची हुक्की यायची. त्याचीसुद्धा आम्हाला काळजी नसे. कारण ऑर्डर सोडणाऱ्या  प्रमाणेच इतर तमाम मोठी मंडळी ५ मिनिटात घोरू लागत व सर्व मुले एकेक करीत पाय न वाजवता बाहेर सटकत.

दिवसा महिला घरात मग्न तर पुरूष बाहेर गप्पा मारण्यात. अगदी नाही म्हणायला आंब्याचा रस काढणे अशा प्रकारची किचकट कामे पुरूषांना सांगितली जायची. ब्रीजची आवड असलेल्या पुरूषांचा पत्त्याचा डाव सकाळपासूनच पडे. मधून मधून चहाचा रतीब चालू असे. परंतु या पुरूषांच्या बोलण्यात नोकरीवरील कामाबद्दल एकही शब्द कधी ऐकू येत नसे. सुट्टी असूनही घरी काम घेऊन आलो हा प्रकार तर अशक्यच! आपल्या अनुपस्थितीत नोकरीवर काय होत असेल याची काळजीही त्यांच्या चेहेऱ्यावर कधी दिसत नसे. एखादेवेळी सर्व मुलांना संध्याकाळी जवळील बागेत अथवा क्रीडांगणावर फिरायला घेऊन जाण्याचे काम ही पुरूष मंडळी करीत. तर बायकांना हमखास तुळशीबागेत शॉपिंगला जायचे असायचे. अगदी सगळे मिळून बाहेर गेलोच तर कोल्ड्रींक हाऊसमधे आंब्याचे आईसक्रीम खायला किंवा रसाच्या गुऱ्हाळात उसाचा रस प्यायला. रात्री सर्वांचा मिळून कॅनेस्टा हा पत्त्यांचा डाव बसे. अगदी लहान मुले सुद्धा पत्ता ओढायला अथवा टाकायला या खेळात सहभागी होत व दमली की तेथेच आई-वडिलांच्या मांडीवर झोपत. हा दिनक्रम महिनाभर चाले व त्याचा येत नसे.

अमेरिकेत मी राहतो तेथून पूर्वेस ॲटलांटिक महासागराचा समुद्र किनारा तर उत्तरेस पोकोनो माऊंटन ७० मैलावर आहेत. त्यामुळे या भागातील लोकांची सुट्टीवर जाण्याची ती लोकप्रिय ठिकाणे अनेक वर्षे होती. अनेक लोकांची व्हेकेशन होमस या ठिकाणी असत व पिढ्यान पिढ्या दर उन्हाळ्यात संपूर्ण कुटुंब तेथे मुक्काम ठोकून असे.

येथील भारतीयांच्या मनात मात्र आजकाल सुट्टीसाठी कुणाच्या घरी जाणे हा विचारसुद्धा मनाला शिवत नाही. नोकरी करणाऱ्या लोकांना सुट्टी दिली तर कंपन्यांचे चेअरमन, बोर्ड मेंबर अशा गरजू व गरीब लोकांचे अत्यंत हाल होतील अशी पक्की समजूत येथील जनतेला करून देण्यात हा देश अत्यंत तरबेज झाला आहे. त्यासाठी नोकरीवर टीम लीडर, सुपरवायझर असे कानाला गोड वाटणारे हुद्दे दिले जातात. ज्यायोगे प्रत्येकाला आपण नोकरीवर एक जबाबदार व्यक्ती आहोत असे वाटत राहते व त्यामुळे सुट्टी घेण्याचे स्वप्नसुद्धा त्यांना पडत नाही. घरातील पुरूष व महिला दोघेही काम करीत असल्याने त्या दोघांचे सुट्टीचे वेळापत्रक जमणेही  कठीण होते.

असं असूनही सुट्टी घेण्याचे ठरलेच तर काही दिवस आरामात काढण्याऐवजी सुट्टी म्हणजे इतिहास व भूगोल या विषयांचा एक अभ्यास दौराच  होतो. ब्रम्हदेवाने आपल्याला माणसाचा जन्म दिला आहे म्हणून आयुष्याच्या अखेरीस आपल्या सुट्टीचे पासबुक तो बघेल या भितीने जगातील काय बघायचे राहिले आहे त्याची यादी करून सुट्टी मिळाली की देश व परदेशातील प्रेक्षणीय स्थळे पादाक्रांत करण्यास सर्वजण सज्ज होतात. त्यामुळे सुट्टीवर जाणे ही वैयक्तिक आवश्यक बाब न होता चार चौघांना सांगायला ते बरे दिसेल म्हणून ती घेतली जाते. प्रत्येक व्यक्तीने सुट्टीवर जावे म्हणजे काय करावे हे टूरिस्ट कंपन्याच ठरवितात व त्यांच्या प्रचाराला आपण सर्व बळी पडतो.

त्यातूनही कोणाच्या घरी चार दिवस गेलोच तर भारतासारखे मुलांना मोकळे सोडून देणे येथे पालकांना जमत नाही. मग मुले अगदी लहान असली तर प्रश्नच मिटला. अशा मुलांचे  पालक  ते  सुट्टीवर आहेत म्हणून रिलॅक्स दिसत नाहीत. दिवसभर मुलाच्या मागे त्या पालकांचा पिंगा चालू असतो. त्यांना पाहुण्यांशी स्वस्थ बसून बोलायला, आवडीच्या चार गोष्टी करायला वेळ मिळत नाहीत. पुरूष मंडळी तर नावालाच सुट्टीवर असतात. एखाद्या पेशंटला सलाईनची बाटली कायमची लावलेली असावी तसे त्यांचे मोबाईल फोन, ब्लॅकबेरी त्यांना कायमचे चिकटलेले असतात. काही तासांनी ऑफिसात काय चालले आहे याची विचारपूस केल्याशिवाय त्यांना राहवत नाही किंवा ई मेल तपासल्याशिवाय आपण नोकरीवर सुरक्षित आहोत याची खात्री  त्यांना वाटत नाही.

अर्थात वैयक्तिक आनंद कसा मिळवावा ही प्रत्येकाची खाजगी बाब आहे. या उन्हाळ्याच्या सुट्टीत तो आनंद तुम्ही पूर्णपणे लुटाल अशी मी आशा करतो.

**- मोहन रानडे**

**editorbmm@yahoo.com**

बृहन्महाराष्ट्र वृत्त

Subscription Remittance Address
BMM Newsletter
144 Hope Road,
Holland, PA 18966-5408
*Or call 1-800-300-6430 to pay by credit card. Master Card, Visa, American Express and Discover is accepted.*


**INSURANCE & REAL ESTATE**

**HEALTH INSURANCE FOR VISITORS FROM ABROAD**
Reasonable Rates. Administering this program for more than 15 years.

**LIFE INSURANCE**
Lowest rates in USA. Reputable carriers

**REAL ESTATE**
Hotels/Motels, Businesses

**Administering this program for more than 25 years**

**Contact: Shashi Thakur, Ph.D.**
Tel: (901)854-9451 Fax : (901)853-4809
Cell: (901)230-3209
E-mail: sjthakur@bellsouth.net

**HEALTH INSURANCE**

**INDIVIDUAL & GROUP HEALTH INSURANCE FOR**

*** VISITORS**
*** H-1 B VISA HOLDERS**
*** PERMANENT RESIDENTS**
**( Some restrictions apply)**

**For more information:**
**Contact: Padmaja Bapat**
**Independent Insurance Agent**
**616 Rhodes Hill Court**
**Martinez, GA 30907**

Tel: (800)204-1939
Fax : (706)860-7268
E-mail: padmajabapat@yahoo.com
Website: visitors-insurance.com